Asmita C. Seretari (Music) 21-22

SJIF Impact Factor - 5.67

E- ISSN 2582-5429

# AKSHARA

## Multidisciplinary Research Journal

Peer-Reviewed & Refereed International Research Journal

May 2022 Special Issue 05 Volume V (A)

Chief Editor : Dr. Girish S. Koli, AMRJ
For Details Visit To - www.aimrj.com

Akshara Publication

# Akshara Multidisciplinary Research Journal

Peer-Reviewed & Refereed International Research Journal

**May 2022**

**Special Issue 05 Volume V (A)**

Scientific Journal of Impact Factor (SJIF) Impact-5.64

Scientific Journal Impact Factor
TOGETHER WE REACH THE GOAL

International Impact Factor Services

International Society for Research Activity (ISRA)
Journal-Impact-Factor (JIF)

Digital Online Identifier-Database System
An International Digital and Virtual Library

*Akshara Publication*
Plot No 143 Professors colony,
Near Biyani School, Jamner Road, Bhusawal Dist Jalgaon Maharashtra 425201

E- ISSN 2582-5429

AMRJ

Akshara Multidisciplinary Research Journal

Peer-Reviewed & Refereed International Research Journal

May 2022 Special Issue 05 Volume V (A) SJIF Impact- 5.67


| Sr.No | *Title of the Paper* | Author's Name | Pg.No |
|---|---|---|---|
| 21 | कथाकार बी. रघुनाथ | प्रा. ज्योत्स्ना अनिल चन्ने | 97 |
| 22 | 'लदनी' या आत्मकथनातील वाङ्मयीन विशेष | श्री. रामचंद्र नामदेव धर्मसाले | 99 |
| 23 | उत्तर-महाराष्ट्र पूर्वीचे खान्देशातील विश्वकर्मा गुजराती सुतार समाजाचा आर्थिक अभ्यास | डॉ. कैलास रतीलाल चव्हाण | 103 |
| 24 | भारतीय संगीतकला आणि 'कोविड-१९ महामारीच्या काळातील जनजीवन' | अस्मिता चं. सेवेकरी | 109 |
| 25 | स्त्री सक्षमीकरणात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या योगदानाचा अभ्यास | सुबोध महादेव वाकोडे | 113 |
| 26 | प्रेरक साहित्याचा महामेरू : साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे | स्वप्नील युवराज भोसले | 118 |
| 27 | महात्मा ज्योतिबा फुले यांचा सत्यधर्म | प्रा. श्रीमती मीना जाधव- सावंत | 122 |
| 28 | डॉ. पंजाबराव देशमुख यांचे कृषी व कृषकांच्या उन्नतीसाठी योगदान | प्रा.डॉ. विवेक गं. देशमुख | 126 |
| 29 | महात्मा फुले यांच्या शैक्षणिक विचारांचे राष्ट्रीय विकासातील योगदान | प्रा. दिपाली रा. पाटील | 129 |
| 30 | शिवकालीन महाराष्ट्र : व्यापार व उद्योगधंदे | प्रा. डॉ. अमोल प्रकाश पाटील | 134 |
| 31 | औरंगाबाद जिल्ह्यातील पिकांची उत्पादन क्षमता आणि रासायनिक खतांच्या वापराचा भौगोलिक अभ्यास | आजिनाथ नानाराव जिवरग | 137 |

E- ISSN 2582-5429
AMRJ
Akshara Multidisciplinary Research Journal
Peer-Reviewed & Refereed International Research Journal
May 2022 Special Issue 05 Volume V (A) SJIF Impact- 5.67

## Editorial Board

**-: Chief & Executive Editor:-**

**Dr. Girish Shalik Koli**
Dongar Kathora
Tal.Yawal, Dist. Jalgaon [M. S.] India Pin Code: 425301
Mobile No: 09421682612
Website:www.aimrj.com Email:aimrj18@gmail.com

**-:Co-Editors :-**

- **Dr. Sirojiddin Nurmatov,** Associate Professor, Tashkent Institute Of Oriental Studies, Tashkent City, Republic Of Uzbekistan
- **Dr.Vivek Mani Tripathi,** *Assistant Professor,* Faculty of Afro – Asian Languages and Cultures, Guangdong University of Foreign Studies, Guangzhou, Guangdong, China
- **Dr.Maxim Demchenko** Associate Professor Moscow State Linguistic University, Institute Of International Relationships, Moscow,Russia
- **Dr.Chantharangsri Phrakhrusangkharak Yanakorn,** Assistance Professor Songkhla,Thailand
- **Dr.Mohammed Abdraboo Ahmed Hasan,** Assistance Professor (English) The Republic of Yemen University of Abyan General manager of Educational affairs in University of Abyan ,Yemen.
- **Dr. Vijay Eknath Sonje,** *Assistant Professor* (Hindi) D. N. College, Faizpur [M. S.]
- **Mr. Nilesh SamadhanGuruchal,** *Assistant Professor* (English)Smt. P. K. Kotecha Mahila Mahavidyalaya, Bhusawal, Dist. Jalgaon [M. S.] India.
- **Dr. Shaikh Aafaq Anjum,** *Assistant Professor* (Urdu) Nutan Maratha College, Jalgaon. [M. S.] India.
- **Mr. Dipak Santosh Pawar,** *Assistant Professor* (Marathi)Dr. A.G.D. Bendale Mahila Mahavidyalaya, Jalgaon [M. S.] India.

**AMRJ Disclaimer:**

*For the purity and authenticity of any statement or view expressed in any article. The concerned writers (of that article) will be held responsible. At any cost member of Akshara's editorial Board will not be responsible for anyconsequences arising from the exercise of Information contained in it.*

E- ISSN 2582-5429

Akshara Multidisciplinary Research Journal
Peer-Reviewed & Refereed International Research Journal

May 2022 Special Issue 05 Volume V (A) SJIF Impact- 5.67

24

# भारतीय संगीतकला आणि 'कोविड-१९ महामारीच्या काळातील जनजीवन

अस्मिता चं. सेवेकरी
सहाय्यक संगीत प्राध्यापिका,
एम्.पी.एच्.कला,विज्ञान व वाणिज्य महिला महाविद्यालय, मालेगाव, जिल्हा नाशिक

**सारांश:**

'संगीत ही सूर, लय, शब्द, भाव इत्यादींच्या माध्यमातून साकार होणारी कला असून गायन, वादन आणि नृत्य या तिन्ही कलांचा संगम असलेली सर्वश्रेष्ठ ललितकला आहे', असे प्राचीन कालापासून संगीतज्ञांनी सिद्ध केलेलेच आहे. मानवी भावना व्यक्त होण्यासाठी उद्युक्त करणारी कला आणि सृष्टीतील सर्व सजीवांवर प्रभाव टाकणारी अत्यंत उपयुक्त अशी संगीत ही कला आहे. जेष्ठ शास्त्रीय गायिका पद्मविभूषण डॉ.प्रभा अत्रे यांनी लिहिलेल्या 'सुस्वराली' या सांगीतिक पुस्तकात पुढील ओळींमधून संगीतातील सुरांचे निर्गुणाकडून सगुणाकडे साकार होणे, हे अत्यंत सुंदर रितीने व्यक्त झालेले आहे.

'साकार':
''म्हणे सुरांना रंग नाही गंध नाही
पण मानवी भावनांच्या सूक्ष्म स्पंदनांना जेव्हा त्यांचा स्पर्श होतो,
तेव्हा निर्गुण-निराकार सगुण-साकार होतो''.....('सुस्वराली')

प्रत्येक परिस्थितीत जीवन जगतांना सर्व सजीवसृष्टी भावनांशी निगडीत असल्याने आजूबाजूच्या घडणाऱ्या परिस्थितीचा अगदी निसर्गातील सजीव सृष्टीवर, मानवादी सर्वसामान्य लोकांवर, रसिक श्रोत्यांवर, संगीतकलाकारांवर आणि त्यांच्या कला सादरीकरणात, संगीतकला जोपासण्यात पडलेला प्रभाव त्या-त्यावेळी कालपरत्वे दिसून आला आहे आणि त्यावर संगीतकलेने विविध प्रकारे दिलेला प्रभावी आधार,दिलासाही वेळोवेळी दिसून आलेला आहे. संगीतकलेची प्राचीन पारंपरिकता जपत असतांना भारतीय संगीतकलेत कालपरत्वे जतन,संवर्धनासाठी विविध प्रकारच्या सुधारणा, सुविधा उपलब्ध झालेल्या आपल्याला आढळतात. आधुनिक काळातही वैज्ञानिक संशोधन करणारे शास्त्रज्ञही संगीत कलेचे मानवी जीवनातील भावनिक स्थान जाणतात, त्यामुळे संगीत कलेचे सुलभतेने वैज्ञानिकरण करण्याचे विविध प्रयोग यशस्वी झालेले आहेत.

जगातील इतर देशांप्रमाणे आपल्याही भारत देशात सरकारी आदेशानुसार 'कोविड-१९' म्हणजेच 'कोरोना' या अचानकपणे उद्भवलेल्या संसर्गजन्य महामारीमध्ये साधारण २०२० हे नवीन वर्ष सुरु होताना अनेक देशांप्रमाणे आपल्याही भारत देशातील लोकांच्या जीवाला धोका असल्याने भारतातील सर्व लोकांचा आपापसांत तसेच बाहेरील परदेशातील लोकांशी संपर्क येऊ नये, हा खबरदारीचा उपाय म्हणून काही कालावधीकरिता 'लॉकडाऊन' जाहीर करावा लागला. त्यामुळे लोकांना केवळ जीवनावश्यक बाबींसाठी फक्त घराबाहेर पडता येणे शक्य होते. बाकीचा कालावधी दिवसभर आपापल्या घरांमध्ये व्यतीत करण्याचे बंधन आले होते.त्यामुळे बरेच उद्योगधंदे बंद पडू लागले व बऱ्याचजणांचे रोजगार, नोकरीधंदे अशा बिकट प्रसंगी माणसांच्या शारीरिक स्वास्थ्यासोबत मानसिक स्वास्थ्य जपणे, ही आवश्यक बाब निर्माण झाली. सर्वच परिस्थितींत ते या कोरोनासारख्या कठीण काळात तसेच आजतागायत संगीत कला ही अगदी कलाकारांपासून सर्वच सामान्य माणसांपर्यंत परोक्ष-अपरोक्ष अशा विविध पद्धतींनी भावनिक आधार देण्यात, मानसिक शांततेचा संदेश देत, मनोरंजन करण्यात, ईश्वरी अधिष्ठान बळकट होण्यासाठी सर्वोत्तम साधन, ज्ञान संवर्धन करण्यात तसेच आर्थिक स्वावलंबन घडवण्यासाठी उपयुक्त वरदान ठरलेली आहे. 'कोविड -१९ (कोरोना)' सारख्या या संसर्गजन्य महामारीच्या प्रतिकूल सद्यपरिस्थितीत जनजीवनास भारतीय संगीतकलेचा मिळालेला आधार, याचा काही प्रमाणात आढावा प्रस्तुत लेखाद्वारे घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**'कोविड-१९' या संसर्गजन्य महामारीतील भारतातील जनजीवनावर झालेल्या दुष्परिणामांच्या पार्श्वभूमीवर भारतीय संगीतकलेचा दिलासा :**

भारतात साधारण जानेवारी,२०२० पासून 'कोविड-१९' ची केस सापडण्यास सुरवात होऊन, त्यानंतर संसर्गजन्य अशा 'कोविड-१९' चे दुष्परिणाम भारतभर पसरत असताना भारतभर मार्च,२०२०मध्ये जमावबंदी, संचारबंदी (लॉकडाऊन) घोषित करण्यात आली. याच कालावधीत उदरनिर्वाहासाठी सर्व जीवनावश्यक वस्तू घरी ' होम डिलिव्हरी ' पद्धतीने मागवून तसेच सर्व

E- ISSN 2582-5429

AMRJ

Akshara Multidisciplinary Research Journal

Peer-Reviewed & Refereed International Research Journal

May 2022 Special Issue 05 Volume V (A) SJIF Impact- 5.67

व्यवहार घरातूनच ऑनलाईन करण्याकरिता इतर देशांतील लोकांप्रमाणे सर्व भारतीयांचीही रोजची धडपड सुरू झाली. तसेच धावपळीचे जीवन जगणाऱ्या लोकांना नोकरीत,उद्योगधंद्यांत अनेक प्रकारच्या तडजोडी कराव्या लागल्या, त्यातून उद्योगधंद्यातील मंदी व त्यामुळे नोकरीतील बदल, बरेच जणांचे बेरोजगार होणे, त्यात वाढती महागाई, आर्थिक ओढाताण त्यामुळे लोकांनी कौटुंबिक प्राथमिक गरजा भागविण्यासाठी स्वतःचे नवनवीन उद्योग धंदे सुरु करुन उदरनिर्वाहासाठी आटोकाट प्रयत्न केलेले दिसून येतात.

या सर्व ताणतणावाच्या परिस्थिती मध्येही संगीत कला ही मानवी मनाला दुःख हलके करण्यात, सुख-दुःखादी विविध भावना व्यक्त होण्यासाठी,मनाला हलकासा दिलासा देत, मानवास आशादायी, संतुलित जीवनाचे चित्र मग ते आभासी का असेना,ती मानसिक दृष्टया अनुभवता येण्यास उपयुक्त ठरली आहे. जीवन जगण्यात सकारात्मकता, भावनिकता जीवनात प्रत्यक्षात यावी, म्हणून भारतीय संगीतकला ही रागसंगीत, उपशास्त्रीय संगीत, सुगम संगीत, चित्रपट संगीत इत्यादी विविध सांगीतिक रुपांद्वारे शांततेचा, सहकार्याचा, आनंदी वृत्तीचा पुरस्कार करणारी ठरलेली आहे.

याकरता प्रयत्नशील असलेले या संगीत कलेतील गायक, वादक,नर्तक तसेच अभिनयादी विविध क्षेत्रांतील कलाकार आणि तंत्रज्ञ यांनी टीव्ही, इंटरनेट, मोबाईल इत्यादी अनेक प्रकारच्या वैज्ञानिक तंत्रज्ञानाद्वारे संगीताद्वारे व्हिडिओ –ऑडिओद्वारे माध्यमांतून या 'कोरोना महामारी' विषयी प्रबोधनात्मक शास्त्रीय बंदिशरचना व गायन, सुगम गीतगायन, आणि संगीतांतील आशादायक,आल्हाददायक सुरावटीन्द्वारे वाद्यसंगीतातून मानसिक दिलासा, शांतता मिळवून देण्यास, जनमानसाचे प्रबोधन व आरोग्य विषयक खबरदारी विषयी माहिती सातत्याने समाजापुढे प्रसारित करण्यास शांतीदूतांप्रमाणे चोख कार्य केले आहे.

**'कोविड-१९ (कोरोना)' काळात भारतीय संगीत कलेद्वारे कलाकारांनी केलेले कार्य व सर्वांच्या जीवनावर झालेला प्रभाव:**

पूर्वीपासूनच संगीत ही कला ईश्वरी उपासना म्हणून, छंद म्हणून जोपासण्यासाठी, माणसाच्या ताणतणावादी भावनांवर फुंकर घालावी म्हणून मनोरंजनादी भावनाविष्कारासाठी , माणसाला कलाकार म्हणून घडविण्यास, सांस्कृतिकदृष्ट्या समृद्ध होण्यासाठी, आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होण्यासाठी विविध प्रकारे जतन,प्रचार , प्रसारित केली जात आहे, कलाकारांद्वारे संवर्धित केली जात आहे आणि जगभरातील संगीत रसिकश्रोते कलेचा आस्वाद घेत आहेत.कोणतीही कला ही आयुष्यभर रोजच रियाज करुन जोपासण्याची सहनशक्ती,प्रतिभा,सचोटी असलेल्या कलाकारांनाच प्रसन्न होते,वश होते. या नियमाला संगीत ही ललितकलाही अपवाद नाही. संगीताची व्याप्ती अथांग सागरासारखी संपूर्ण पृथ्वीवर व्यापून राहिलेली आहे . प्रत्येक मनुष्याच्या जीवनात 'संगीत' जन्मापासून ते मनुष्य जन्माच्या शेवटच्या टप्प्यापर्यंत महत्वाचा,अविभाज्य भागच आहे आणि याचा प्रत्यय नेहमीप्रमाणेच कोरोना महामारीच्या कठीण काळातही प्रत्येकाने प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष रित्या अनुभवलेला आहे. कोरोना काळात मानवाच्या पुढील चार मूलभूत गरजा झाल्या त्या म्हणजे अन्न, वस्त्र, निवारा, आणि आरोग्य(शारीरिक आणि मानसिक). या संकटाच्या काळात खरी साथ दिली ती संगीतानेच. आपल्याला आजूबाजूच्या परिस्थितीची, अगदी सावलीची सुद्धा भीती वाटत होती तेव्हा संगीतातील स्वर-लयींनीच आयुष्य छान सावरलं , जगण्याची नवी उमेद दिली. संगीत मग ते वाद्य असो किंवा कंठ संगीत अथवा नृत्य, त्यातल्या स्वरांची जादू माणसाच्या मनावर राज्य करते व भावना जपते. लॉकडाऊन मध्ये पूर्ण घरातच असतांना अविरत साथ दिली ती मोबाईल,टी.व्ही.रेडियो,इंटरनेट इ. साधनांनी. परंतु माणसातलं खरं माणूसपण जपलं ते संगीतानेच. मोबाईलवर नुसता मेसेज रिंगटोन वाजल्यावर पण छान वाटायचं, आधार वाटायचा. घरबसल्या जगातले संगीताचे विविध प्रकार ऐकता आले, त्याचा खऱ्या अर्थाने आस्वाद घेता आला.

या अवघड काळात ताण-तणावामुळे प्रत्येक माणूस संगीताशी जास्तच 'कनेक्ट' झाला. जुनं संगीत 'टेक्नोसॅव्ही' होऊन त्याने नव्या रुपात तरुणाईलाही आनंद दिला, तर जुनी पिढीही जुनी गाणी, संगीत ऐकत त्याचबरोबरीने तरुण पिढी ऐकत असलेले मॉडर्न संगीतही आपसूक कानावर पडत यातल्या नाविन्यपूर्ण प्रकारांची माहिती घरबसल्या मिळून मनाने तरुण झाली. या संगीताच्या प्रभावाने, श्रवणाने असंख्य लोकांची मनं सावरली , आबालवृद्धांना जीवन जगण्याची आशा दिली. या कोरोनाने जगाला व्यावहारिकदृष्ट्या थांबवलं, लांब केलं पण तेव्हाच संगीतानेच सामान्य माणसालाही जगण्यातला आनंद, थोडक्यात समाधान शोधायला शिकवलं ; संगीत श्रवणाद्वारे तसेच स्वतः संगीत शिकताना, जमेल तसे स्वतःच्या, आप्तस्वकीयांच्या आनंदासाठी संगीताद्वारे समाधान शोधायला भाग पाडलं.

भारतीय रागसंगीत हे रोगांवर उपचार करण्यासाठी उपचार चिकित्सा पद्धती म्हणूनही उपयुक्त आहे. अगदी कोरोना कक्षामधील मधील जे चालते-फिरते रुग्ण होते, त्यांना संध्याकाळी अथवा ठराविक वेळी संगीतातील धून लावून त्यावर ताल धरुन

काही व्यायाम प्रकारही ब-याच कोरोना हॉस्पिटल्स, सेंटर्स मध्ये असे सांगीतिक उपक्रम राबविले गेले व ते ब-याच रुग्णांना लवकर बरे करण्यासाठी यशस्वी झाले आहेत.

तसेच संगीतातील उदा. सुगम संगीतातही तसेच अन्य विविध संगीतप्रकारातून रचना श्रोत्यांपर्यंत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन प्रसारित करण्यात आल्या. टेलिव्हिजनच्या 'सह्याद्री मराठी' सारख्या वाहिन्यांवरील कोरोनासंदर्भातील प्रबोधन जागरुकता वाढविण्याच्या नवनवीन सांस्कृतिक उपक्रमांसोबतच जुन्या विविध सांगीतिक कार्यक्रमांचा खजिना परत प्रसारित करुन महत्वाची सांगीतिक कलेतील दालने संगीत रसिकांना घरोघरी परत पोहोचवली.

संगीताच्या साधनेतून होणारा प्राणायामही या कोरोनासारख्या अवघड महामारीच्या काळात फुप्फुसांची क्षमता टिकवण्यासाठी, हृदयाच्या रक्ताभिसरण क्षमता सुरळीत करण्यासाठी व लोकांच्या मनाला आल्हाद देणारा ठरला आहे.

संगीत क्षेत्रातील जे प्रस्थापित संगीत कलाकार होते,त्यांना आपल्या संगीतात विविध प्रयोग करण्यास, ज्ञान संवर्धन करण्यात, इतरांना ऑनलाईन संगीत कलेचे ज्ञान देण्यासाठी, कलेतील शास्त्र तसेच कलेतील सादरीकरण पक्ष यांची परत नव्याने सांगड घालून नवनवीन प्रयोग,संधी निर्माण करता येतील का, याचा विचार करुन तशा विविध उपाययोजना, तसे उपक्रम आभासी तंत्रज्ञानाच्या (ऑनलाईन) पद्धतीने राबविले गेले. कलाकारांचे प्रत्यक्ष श्रोत्यांच्या उपस्थितीत नेहमीप्रमाणे होणारे संगीत सादरीकरण यांना जरी कोरोना काळात स्थगिती देण्यात आली होती, तरीही या काळात (ऑनलाईन) आभासी माध्यमाद्वारे आपली संगीत कला जगभर पोचविण्याचा सर्व थरांतील कलाकारांनी प्रयत्न केलेला आहे. याचा विस्थापित,तसेच आर्थिक दृष्ट्या सक्षम असलेल्या कलाकारांवर फारसा परिणाम जाणवला नसेल, परंतु या संगीत क्षेत्रात स्थिरावू पाहणाऱ्या उदयोन्मुख, नवोदित कलाकारांना मात्र कौटुंबिक गरजा भागविण्यासाठी आर्थिक दृष्ट्या मदतीची गरज प्रकर्षाने जाणवली, तसेच काही अनिश्चित काळासाठी सांगीतिक सादरीकरण, कलाकार म्हणून प्रसिद्धीसाठी थांबवावी लागणारी एकंदर धडपड यातून संगीत कलाकारांची होणारी ससेहोलपट, त्यांना तसेच त्यांच्या कुटुंबास जगण्यासाठी अन्न, वस्त्र,आरोग्य याकरिता करावी लागणारी धडपड, सहनशक्ती पणाला लावणारे विविध प्रसंग, त्यांना सावरणा-या, मदत करणा-या विविध दातृत्ववान व्यक्ती असे मानवी देवदूतही जगासमोर आले. तसेच सरकार दरबारीही संगीत कलाकारांना आर्थिक मदत देण्यात आली व छोट्या छोट्या कलाकारांना आपल्या संगीताच्या सादरीकरणाची संधी मिळण्याकरिता विविध प्रस्थापित संस्थांकडून तसेच विविध कलाकारांकडून टी.व्ही.च्या विविध वाहिन्यांवर, आंतरजालावरील (इंटरनेट) यू-ट्यूब, फेसबुक, इंस्टाग्राम, व्हॉटस्ॲप, आदी अनेक आभासी तंत्रमाध्यमांतून प्रयत्न करण्यात आले. ज्या संगीत रसिकांना संगीताची आवड होती, पण संगीत शिकण्यास वेळ मिळत नव्हता, त्यांना कोविड-१९ च्या काळात 'ऑनलाईन वर्क' मुळे 'ऑनलाईन' संगीत शिकायला सुरुवात करण्याची इच्छा पूर्ण झाली. संगीत शिक्षणाकरिता योग्य ती 'वायफाय इंटरनेट' सुविधा उपलब्ध असणे आवश्यक झाले. भारतातील नावाजलेल्या कलाकारांकडून त्यांच्या सांगीतिक शिक्षण संस्थांमध्ये एरवी इच्छा असूनही स्वतःचे दूर निवासस्थान असल्याने,वेळ नसल्याने इत्यादी विविध कारणांनी आत्तापर्यंत प्रत्यक्ष शिकण्याची इच्छा असूनही त्यांना संगीत शिकता आलेले नव्हते , अशा प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्यांसाठी संगीत रसिकांना या कलाकारांकडून संगीत शिकण्याची 'ऑनलाईन संगीत शिक्षण पद्धत' ही पर्वणीच ठरली आहे आणि या विस्थापित कलाकारांनी स्वतःची आर्थिक घडी व्यवस्थित बसवत त्यांच्यापेक्षा छोट्या आणि गरजू कलाकारांना आर्थिक निधी जमा करण्यात शक्य तेवढी मदत केलेली आहे. या महामारीच्या काळात त्याप्रमाणे इतर सर्वच विषयांचे अध्ययन- अध्यापन, प्रसार,संधी,व्यवसाय जसे जगभर ऑनलाईन आभासी माध्यमाद्वारे होऊ लागले त्याचप्रमाणे या आभासी रंगमंचाद्वारे विविध संस्थांद्वारे सांस्कृतिक कार्यक्रम, भारतातील तसेच जगभरातील संगीत क्षेत्रांतील विविध विषयांवर वेबिनार्स,संगीत अध्ययन- अध्यापन, संगीत महोत्सव, संगीतज्ञांची ऑनलाईन संगीत चर्चा, संगीत सादरीकरण यातून जगभर संगीत कलेच्या अभ्यासाचेही प्रयत्न जोरदार झाले, तसेच संगीत कलाकारांद्वारे ऑनलाईन माध्यमाद्वारे मग ते फेसबुक असो वा यू-ट्यूब, व्हॉट्स अप, इंस्टाग्राम इत्यादींसारख्या अनेक विविध तंत्रज्ञानांद्वारे संगीत कलेचे ज्ञान संवर्धित करण्यासाठी, संगीत कलेच्या प्रसारासोबतच सकारात्मकता, शांतता पसरवण्याचा, आधार-दिलासा देण्याचा, मनोरंजन करण्याचेही प्रामाणिक प्रयत्न केले गेले. संगीताच्या विविध प्रकारच्या सांगीतिक रचना उदा. सुगम संगीत,लोकगीत इत्यादी रचनांच्या माध्यमातून कोरोना विषयक जनजागृती संगीतकलाकाराद्वारे प्रभावीपणे झाली. शास्त्रीय संगीतात देखील रागामध्ये बंदिशीची रचना करुन 'कोरोना व्हायरस' प्रती खबरदारी,जागरुकता आदी संदर्भातील प्रबोधन जागरुकता निर्माण करण्याचे प्रयोग यशस्वी झाले. उदाहरणादाखल प्रस्तुत लेखाच्या शेवटी आंतरजालावरील (इंटरनेट) काही माहिती, काही कलाकारांच्या संगीत सादरीकरणाच्या 'यू-ट्यूब' इत्यादी विविध वेबसाईटवरील काही लिंक दिलेल्या आहेत.

अशाप्रकारे या प्रतिकूल काळातदेखील संगीतकलेचा आधार घेत जनसामान्य लोक , भारतीयांबरोबर परदेशांतील भारतीयही आणि सर्व देशांतील संगीतकलेप्रती आस्था असणारे रसिक , कलाकार संगीतकलेच्या रूपांत भावनांची देवाण-घेवाण करत, सामूहिकरीत्या मानसिकरीत्या एकत्र येऊन एकटेपणावर मात करत, जीवनातील नवनव्या प्रेरणा, संधी शोधत जगभरात एकमेकांशी परत जोडले गेले आहेत.

**निष्कर्ष:**

संगीतकला ही या सृष्टीतील सुखी आणि दुःखी दोन्ही प्रसंगांतही साथ देणारी अशी सर्वोत्तम ललितकला आहे, याचा प्रत्यय नेहमीप्रमाणेच या 'कोविड-१९(कोरोना)' काळासारख्या अवघड अशा संसर्गजन्य महामारीच्या काळातही आला आहे. या काळात संगीतातील विविध प्रकारांमध्ये काही नवीन प्रयोग, नवाविष्कार इत्यादी करण्याचेही धाडस ब-याच संगीत कलाकारांनी केलेले आहे आणि जीवनात सकारात्मकता, आशादायी वातावरण निर्माण करण्यासाठी, माणुसकी आणि आपली संस्कृती,सामाजिक बांधिलकी जपण्यासाठी संगीत जगतातातील कलाकार आणि रसिकश्रोत्यांनी अविरत प्रयत्न केले आहेत.

**संदर्भसूची:**

1. सुस्वराली': लेखिका : पद्मविभूषण डॉ.प्रभा अत्रे, पान नं.70
2.https://news.un.org/hi/story/2020/12/1036462
3. https://www.google.com/amp/s/www.bbc.com/marathi/india-55377172.amp
4.http://www.vkm.org.in/news/2020-21-covid-task-force-2-music-for-health
5.https://www.google.com/amp/s/m.jagran.com/lite/news/national-music-became-the-support-of-the-people-during-the-coronavirus-pandemic-period-21758656.html
6.https://youtu.be/NKO_wA6igTc
7.https://youtu.be/iCyCWMlYfh0
8.https://youtu.be/Xn2ZPssAiy0

□ □ □